माहिती हवीय?

विद्या अनंत संगमनेरकर, आंबेजोगाई.

□ जयराजने निरुपा रॉय, मीनाकुमारी, नरगीस यांच्याशिवाय कोणकोणत्या नायिकांबरोबर नायकाची भूमिका केली?

— माधुरी (*रसिली रानी*), रोशन आरा (*स्पार्कलिंग यूथ*), यकबाल (*भवानी नो भोग*), झेबुन्नीसा (*पर्ल*), सीतादेवी (*शिकार*), सितारा (*औरत का दिल*), बिब्बो (*मायाजाल*), दुर्गा खोटे (*पतितपावन*), पन्ना (*जहरी इश्क*), ललिता (*दर्दे दिल*), खातून (*शेर दिल औरत*), लीला चिटणीस (*बेरोजगार*), खुरशिद (*साकी*), ऊर्मिला गुप्ता (*तुफानी खजाना*), रेणुकादेवी (*भाभी*), रोझ (*रायफल गर्ल*), प्रमिला (*बिजली*), निर्मलादेवी (*जुआरी*), मेहताब (*लेदर फेस*), शांता हुबळीकर (*प्रभात*), स्नेहप्रभा प्रधान (*खिलौना*), हंसा वाडकर (*मेरा गाव*), शोभना समर्थ (*नई दुनिया*), लीला देसाई (*तमन्ना*), देविकाराणी (*हमारी बात*), नीना (*प्रेमसंगीत*), गीता निझामी (*पन्ना*), सरदार अख्तर (*राहत*), पारो (*धनवान*), नूरजहाँ (*हमजोली*), वीणा (*राजपुतानी*), नासरीन (*शहाजहान*), निगार सुलताना (*खेला*), रागिनी (*मनमानो*), सवितादेवी (*मनमानी*), रेहाना (*चंदा की चांदनी*), रंजना (*साजन का घर*), सुरैया (*अमर कहानी*), सुलोचना चटर्जी (*लाडली*), गीताबाली (*गरीब*), मधुबाला (*सिंगार*), मीनाकुमारी (*मगरूर*), निम्मी (*राजमुकुट*), शकीला (*हातीमताई*), नादिरा (*प्यारा दुश्मन*), उषा किरण (*परिवार*), सुलोचना (*छोटा जवान*), शीला रमाणी (*सुलतान डाकू*), शशीकला (*जहाजी लुटेरा*), जब्बीन (*जग्गा डाकू*), अनिता गुहा (*सम्राट पृथ्वीराज चौहान*), निशी (*मिस गुडनाइट*) या नायिकांच्याबरोबर जयराजनी भूमिका केली. या नायिकांपैकी दुर्गा खोटे कालांतराने सिंगारमध्ये त्याच्या आई बनल्या. *एक ही भूल*मध्ये त्याची मुलगी बनलेली मीनाकुमारी मगरूरमध्ये त्याची नायिका बनली.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ संगीतकार रवींना कोणकोणत्या चित्रपटासाठी पारितोषिक मिळालं?

— *घराना, खानदान*साठी त्यांना फिल्मफेअर पारितोषिक मिळालं.

□ *तलाश-ए-हक्क, हृदयमंथन, मॅग्म फॅशन, मोती का हार, पर्दानशी* या चित्रपटातील बालतारका कोण? नायक-नायिका कोण?

— या चित्रपटांपैकी पर्दानशी वगळता बाकीच्या साऱ्या चित्रपटांत नरगीसने बेबी रानी या नावाने बालतारकेची भूमिका केली होती. *पर्दानशी*मध्ये कोणी बालतारका नव्हती. नरगीस या नावाची एक अभिनेत्री या चित्रपटात होती. पण ती एक-दोन चित्रपटातच गायब झाली. *तलाश-ए-हक्क* व *हृदयमंथन* या चित्रपटात नरगीसची आई जद्दनबाई नायिका होती. *याकूब, तलाश-ए-हक्क*चा नायक होता. आशिक हुसेन *हृदयमंथन*चे नायक होते. *मोती का हार*मध्ये आशिक हुसेन व मेहताब नायक-नायिका होते. या तिन्ही चित्रपटांची निर्माती-दिग्दर्शिका व संगीत-दिग्दर्शिका जद्दनबाई होती. *पर्दानशी*मध्ये गिरिधर व राम दुलारी नायक-नायिका होती.

□ करण दिवाणने सुरैयाबरोबर कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली?

— *दो दिल, शक्ती, दुनिया, मिस १९५८.*

ज्ञानेश्वर महाडिक, महाड.

□ वास्तीने कोणकोणत्या चित्रपटात नायक सहनायकाची भूमिका केली? या चित्रपटात त्याच्या नायिका कोण होत्या?

— १९४० साली न्यू थिएटर्सच्या नर्तकी या चित्रपटात सहनायकाची भूमिका करून *वास्ती* सर्वात प्रथम चित्रपटात आला. त्यानंतर त्याने नायक, सहनायकाची भूमिका केलेले चित्रपट पुढीलप्रमाणे कुमारी (राधारानी), आवाज (माया बॅनर्जी, स्वर्णलता), नई दुनिया (शोभना समर्थ), शारदा (मेहताब), नमस्ते (प्रोतिमादास गुप्ता), संजोग, बहार, जीवन (मेहताब), पहले आप (शमिम), रतन (स्वर्णलता), एक दिन का सुलतान (मेहताब), फूल (वीणा) १८५७ (निगार), उमरखय्याम (सुरैया), श्याम सबेरा (स्वर्णलता), शमा (मेहताब), डाक बंगला (सुरैया), चित्तोडविजय (मेनकादेवी), देवकन्या (लीला देसाई), दीवानी (मुमताज शांती), डोली (सुलोचना चटर्जी), खूबसूरत दुनिया (मधुबाला), चुनरिया (मनोरमा), काजल, बालम, नाच (सुरैया), गौना (उषा किरण), मांग (रमोला), हैदराबाद की नाजनीन (निगार), शगुन (सुलोचना चटर्जी) नंतरच्या काळात कधी खलनायक तर कधी चरित्र अभिनेता म्हणून तो *परछाई, दिल देके देखो, जब प्यार किसीसे होता है, दो बदन* यासारख्या काही चित्रपटात चमकला.

संगीता दहीदुले, तळेगाव.

□ लीला मिश्रा, दुलारी व प्रतिमादेवी कधी नायिका होत्या का?

— लीला मिश्रा फाळकेंच्या गंगावतरण या एकाच चित्रपटात नायिकेच्या भूमिकेत चमकली. दुलारी १९४७च्या नमक या चित्रपटात नायिका होती. प्रतिमादेवी कधीच नायिका बनली नाही.

□ मराठीला आतापर्यंत सर्वश्रेष्ठ चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे काय?

— १९५३ साली राष्ट्रीय पुरस्कारांची सुरुवात झाली तेव्हा पहिले राष्ट्रीय पारितोषिक *श्यामची आई* या मराठी चित्रपटालाच मिळाले होते.

दशरथ धनावडे, नाणार.

□ दादा कोंडकेंनी निर्माण केलेला पहिला चित्रपट कोणता? दादा कोंडके व उषा चव्हाण यांनी कोणकोणत्या मराठी चित्रपटात एकत्र भूमिका केल्या? दादा कोंडकेंचं नाव गिनिज बुकात नोंदलं गेलं काय?

— दादा कोंडकेंनी निर्माण केलेला पहिला चित्रपट *सोंगाड्या*. दादा कोंडके व उषा चव्हाण यांनी *सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, बोट लावीन तिथं गुदगुल्या, गनिमी कावा, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवापळवी, सासरचं धोतर, वाजवू का?* या मराठी चित्रपटात एकत्र भूमिका केल्या. दादा कोंडकेंचं नाव गिनिज बुकात नोंदलं गेलं नाही. ती दादांनी मारलेली एक थाप होती. ●

सुलक्षणा वसंत मंगनाळे, वांबुर्डे.

□ सर्कसच्या पार्श्वभूमीवर बनलेले चित्रपट कोणकोणते?



मेरा नाम जोकरमध्ये राज कपूर

— *सर्कस गर्ल, सर्कस की सुंदरी, सर्कस किंग, सर्कस क्वीन, सर्कसवाले, चंद्रलेखा, द ग्रेटेस्ट शो ऑन द अर्थ, मर्डर इन सर्कस, मेरा नाम जोकर, अप्पू राजा.*